// सा विद्या या विमुक्तये //

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)

Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325

Website : srtmun.ac.in
e-mail : affi.srtmun@gmail.com

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून थकित संलग्नीकरण शुल्कासह प्रस्ताव सादर करु इच्छिणा–या महाविद्यालयांचे संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव व शुल्क स्विकारणे बाबत.

## :: परिपत्रक ::

संदर्भ :– मा. विद्या परिषद बैठक ऐनेवळचा विषय क्र.०६/४५–२०१९, दि. ११.१०.२०१९.

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या ज्या शिक्षण संस्थानी/महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून संलग्नीकरण शुल्कासह प्रस्ताव विद्यापीठास सादर केलेले नाहीत अशा शिक्षण संस्था/महाविद्यालयांना विद्यापीठाच्या वतीने शिक्षण संस्था/महाविद्यालयनिहाय असंलग्नीकरणाच्या नोटीस पाठविण्यात आल्या होत्या.

याबाबतचा विषय संदर्भिय मा. विद्या परिषद बैठकीत निर्णयार्थ ठेवण्यात आला होता. मा. विद्या परिषदेने या संदर्भात पुढील प्रमाणे ठराव संमत केला आहे. '' शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून संलग्नीकरणाचा शुल्कासह प्रस्ताव विद्यापीठास सादर न केल्यामुळे ज्या शिक्षण संस्थांना/महाविद्यालयांना असंलग्नीकरणाची नोटीस पाठविलेले आहे. परंतु त्यापैकी ज्या महाविद्यालयांनी संलग्नीकरणाचे/नुतनीकरणाचे प्रस्ताव व थकीत विलंब शुल्क स्विकारुन महाविद्यालय पुढे सुरु ठेवण्याबाबत विनंती केली आहे अशा महाविद्यालयांचे संलग्नीकरणाचे/नुतनीकरणाचे प्रस्ताव, संलग्निकरण शुल्क व थकीत विलंब शुल्क स्वीकारण्यास मान्यता देण्यात आली.''

मा. विद्या परिषदेने संमत केलेल्या उपरोक्त ठरावानुसार ज्या शिक्षण संस्थाना/महाविद्यालयांना संलग्नीकरणाचे/नुतनीकरणाचे प्रस्ताव व शुल्क (विलंब शुल्कासहीत) विद्यापीठास सादर करुन महाविद्यालय पुढे सुरु ठेवावयाचे आहेत त्यांनी विद्यापीठास १० जानेवारी २०२० पर्यंत कळवावे. त्यानुसार याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. अन्यथा यापूर्वी असंलग्नीकरणाची केलेली कारवाई चालू राहील.

सदरचे परिपत्रक हे विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर **affiliation** या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात आले आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर, )(
विष्णूपुरी, नांदेड–४३१६०६. )(
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०१९–२०२०/2535 )(
दिनांक :– २६.१२.२०१९. )(

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

१. मा. संस्था अध्यक्ष/सचिव/प्राचार्य, सर्व संबंधित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिनीयर प्रोग्रामर, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर **affiliation** या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.



Scanned by CamScanner